19 DEC 2024
तरुण भारत
ग्रंथालय कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ १७ जानेवारीला

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचा ६१ वा दीक्षांत समारंभ शुक्रवार १७ जानेवारी २०२५ रोजी विद्यापीठातील राजमाता जिजाऊ सभागृहात होणार आहे. या समारंभाच्या नियोजनासाठी विविध समित्या नेमल्या आहेत. या समित्यांना विविध प्रकारची कामे नेमून दिली जातात. त्यामुळे सध्या प्रमुख पाहुणे, पदवी प्रमाणपत्रांची छपाई यासह अन्य कामांची लगबग सुरू आहे. विद्यापीठातील समित्यांचे बैठका सत्र सुरू असून नियमानुसार काम करण्याच्या सूचना एका परिपत्रकाव्दारे विद्यापीठ प्रशासनाने दिल्या आहेत.

दीक्षांत समारंभात प्रमुख पाहुण्यांचे स्वागत, बैठक व्यवस्था, दीक्षांत पदवी, पदव्युत्तर प्रमाणपत्राचे वाटप, व्यासपीठावरील मान्यवरांचा ड्रेसकोड, यासह अन्य कामे नेमून दिली जातात. त्यासाठी समित्या तयार केल्या आहेत. दीक्षांत समारंभाचे थेट प्रक्षेपण होणार असल्यामुळे सर्वांनी उत्तम प्रकारे व जबाबदारीने काम करण्याच्या सूचना अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिल्या आहेत. दीक्षांत समारंभाच्या कामासाठी ज्या कर्मचाऱ्यांची नेमणूक केली आहे, त्या कर्मचाऱ्यांना इतर कामे देऊ नये, असे विभागप्रमुखांनी सांगण्यात आले आहे. दीक्षात समारंभाच्या कामाला प्राधान्य देऊन सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याच्या सूचना परिपत्रकाव्दारे देण्यात आल्या आहेत.



- ६१ वा दीक्षांत समारंभ
- समित्या नेमून कार्यक्रमाच्या तयारीची लगबग
- समित्यांनी सूचनांचे पालक करण्याचे परिपत्रकाव्दारे आदेश

## कर्मचाऱ्यांनी या सूचनांचे पालन करावे

- ६१ व्या दीक्षांत समारंभाकडील विविध समित्यांना दीक्षांत समारंभासाठी जर आवश्यक साहित्य खरेदी करावयाचे असेल तर त्याबाबत परीक्षा व मुल्यमापन मंडळाचे संचालकांची प्रशासकीय पूर्वमान्यता घेणे आवश्यक आहे.
- समारंभानंतर एक आठवडयात संपूर्ण खर्चाच्या तपशीलासह देयके दोन प्रतिमध्ये (मूळ प्रत व त्याची सत्य प्रत) दीक्षांत विभागाकडे पाठवावी. पूर्वमान्यता न घेता देयक सादर केल्यास ते लेखा विभागाकडे पाठवले जाणार नाही.
- दीक्षांत समारंभा दिवशी वर्ग—४ मधील सर्व सेवकांनी कार्यालयीन ओळखपत्र व कार्यालयाने पुरविलेले गणवेश टोपीसह परिधान करणे बंधनकारक आहे.
- दीक्षांत समारंभ कामाच्यावेळी संबंधित शिक्षक, अधिकारी व शिक्षकेत्तर सेवकांनी कोणतीही रजा काढू नये, किंवा वरिष्ठांनी शिफारस करू नये. दीक्षांच्या कामाचे आदेश रद्द करण्याबाबत शिफारस करू नये. दीक्षांत समारंभाची रूपरेषा अंतिम झाल्यानंतर आवश्यक त्या सूचना समिती प्रमुखांना दिल्या जातील.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 DEC 2024
पुण्यनगरी

# विद्यापीठात उद्यापासून आविष्कार संशोधन स्पर्धा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्र विभाग व विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठस्तरीय आविष्कार संशोधन महोत्सव स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव दि. २० व २१ डिसेंबर रोजी विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात पार पडणार आहे. यामध्ये कोल्हापूरसह सांगली व सातारा जिल्ह्यातील महाविद्यालय व विद्यापीठ अधिभागातील ४०० विद्यार्थी सहभागी होणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 DEC 2024
सकाळ

# शिवाजी विद्यापीठात उद्यापासून आविष्कार संशोधन स्पर्धा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्र अधिविभाग आणि विद्यार्थी विकास विभागातर्फे विद्यापीठस्तरीय आविष्कार संशोधन महोत्सव शुक्रवारी (ता. २०) आणि शनिवारी (ता. २१) विद्यापीठातील राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात होणार आहे. स्पर्धेचे उद्घाटन शुक्रवारी सकाळी दहा वाजता कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते होणार आहे. कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील महाविद्यालये आणि विद्यापीठ अधिविभागातील ४०० विद्यार्थी सहभागी होणार आहेत, ही माहिती प्रा. डी. एम. पोरे आणि डॉ. एस. एन. तायडे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 DEC 2024
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात उद्यापासून आविष्कार संशोधन महोत्सव

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्र अधिविभाग व विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने २० व २१ डिसेंबरला आविष्कार संशोधन महोत्सवाचे आयोजन केले आहे. विद्यापीठातील राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात होणाऱ्या या स्पर्धेसाठी कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील महाविद्यालये व विद्यापीठ अधिविभागातील ४०० विद्यार्थी सहभागी होणार आहेत. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते शुक्रवार २० डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता या स्पर्धेचे उद्घाटन होणार आहे. शेती, मूलभूत विज्ञान, अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान, आरोग्य विज्ञान, पोषण यासह विविध प्रकारात ही स्पर्धा होईल. संशोधनातील प्रतिभेला प्रोत्साहन देणे हा या स्पर्धेचा उद्देश आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 DEC 2024
लोकमत

# आविष्कार संशोधन महोत्सव उद्यापासून

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्र अधिविभाग व विद्यार्थी विकास विभागाच्यावतीने २० व २१ डिसेंबरला आविष्कार संशोधन महोत्सवाचे आयोजन केले आहे. विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात होणाऱ्या या स्पर्धेसाठी कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील महाविद्यालये व विद्यापीठ अधिविभागातील ४०० विद्यार्थी सहभागी होणार आहेत. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते उद्या, शुक्रवारी सकाळी १० वाजता या स्पर्धेचे उद्घाटन होईल. शेती, मूलभूत विज्ञान, अभियांत्रिकी, तंत्रज्ञान, आरोग्य विज्ञान, पोषण यांसह विविध प्रकारांत स्पर्धा होईल.

19 DEC 2024
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तणाव विरहित राहण्यासाठी योग्य मार्ग शोधा : शुभंकर

## राजर्षी शाहू लोकशिक्षण व्याख्यानमाला

कोल्हापूर, ता. १८ : 'प्रत्येक माणसाला दररोज वेगवेगळे ताण येतात. त्याचा त्या-त्यावेळी निचरा न झाल्यास विविध शारीरिक, मानसिक आजार जडतात. त्यामुळे तणाव विरहीत राहण्यासाठी योग्य मार्ग शोधले पाहिजेत,' असे प्रतिपादन समुपदेशक उर्मिला शुभंकर यांनी केले.

महापालिकेच्या वर्धापन दिनानिमित्त भास्करराव जाधव वाचनालयातर्फे आयोजित राजर्षी शाहू लोकशिक्षण व्याख्यानमालेत त्या बोलत होत्या. देवल समाज क्लबच्या गोविंदराव टेंबे रंगमंदिरमध्ये झालेल्या या व्याख्यानाचा 'चला तणावमुक्त जगूया' हा विषय होता.

शुभंकर म्हणाल्या, 'सकारात्मक ताणातून शेवटी समाधान मिळते, तर नकारात्मक ताणाचा सामना करावा लागतो. लहान मुलांपासून ज्येष्ठांपर्यंत साऱ्यांना विविध प्रकारांचे ताण असतात. त्यातील महिलांना येणारा ताण हा संशोधनाचा विषय आहे. महिलांनी आपले आपल्याशी काय नाते आहे, मी माझ्यासाठी काय करते याचा शोध घ्यायला हवा. ताणाला तोंड न देता पळून जाण्याऐवजी विरंगुळा शोधला पाहिजे. त्यासाठी योग्य मार्ग निवडले पाहिजे. महिला ताणातून मार्ग शोधतात. पण, पुरुष व्यक्त होत नाहीत. त्यातून एकसुरीपणा, एकांगीपणा येतो. अनेकदा चुकीच्या प्रतिक्रिया उमटतात. त्यातून जवळचेच दुखावले जातात. हे टाळण्यासाठी ताणाचा योग्य पद्धतीने निचरा करण्याची गरज आहे.



कोल्हापूर : महापालिकेच्या राजर्षी शाहू लोकशिक्षण व्याख्यानमालेत बोलताना उर्मिला शुभंकर.

ज्येष्ठ जगलेले आयुष्य व नव्या पिढीच्या आयुष्यात फरक असतो. अशावेळी तटस्थ राहण्याची खरी गरज असते. अनेक ज्येष्ठांना ते जमत नाही व प्रश्न निर्माण होऊन ताण तयार होतात. त्यातून बाहेर पडायचे असल्यास संवाद हा मोठा भाग आहे. आपल्या मुलांशी थेट संवाद साधत वाटत असलेल्या अडचणी, त्रास सांगितल्यास त्यावर मार्ग काढता येऊ शकतो. सध्या अनेक ज्येष्ठ सोशल मीडियाचा मोठा वापर करतात, त्यातूनही ताण निर्माण होत आहेत. त्यामुळे मोबाईल वापरण्यास मर्यादा घालून घेण्याची गरज आहे.' यावेळी उपायुक्त साधना पाटील, जलअभियंता हर्षजित घाटगे, प्राचार्य बाबासाहेब उलपे, नगरसचिव सुनील बिद्रे, ग्रंथपाल रत्नाकर जाधव, अधीक्षक प्रशांत पंडत, अशोक यादव, आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 DEC 2024
लोकमत

# 'लेखक आपल्या भेटीला', शिक्षण परिषद उपक्रम

## लवटे अमृत महोत्सव समितीचे आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : ज्येष्ठ साहित्यिक सुनीलकुमार लवटे यांच्या अमृत महोत्सवानिमित्त शनिवारी (दि. २१) लेखक आपल्या भेटीला व शिक्षण परिषद हे दोन उपक्रम होत असल्याची माहिती डॉ. सुनीलकुमार लवटे अमृत महोत्सव समितीचे अध्यक्ष डॉ. जी. पी. माळी यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिली.

याअंतर्गत जिल्ह्यातील १० शाळांमध्ये लेखक आपल्या भेटीला हा उपक्रम सकाळी ८ ते १० यावेळेत होणार आहे. समितीने निवडलेले लेखक त्या त्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांशी संवाद साधतील. याच दिवशी दुपारी १२ वाजता न्यू कॉलेजमध्ये शिक्षण परिषद होईल. यात नवीन शैक्षणिक धोरण राज्य अभ्यासक्रम आराखडा व शिक्षणाची वर्तमान स्थिती या विषयांवर चर्चा होईल. परिषदेचे उद्घाटन न्यू कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांच्या हस्ते होईल. पहिल्या सत्रात शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे बीजभाषण होईल. यावेळी प्राचार्य डॉ. जे. के. पवार, मिलिंद यादव, भाग्यश्री कासोटे यांचा विविध पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात येईल.

दुसऱ्या सत्रात ज्येष्ठ विचारवंत सदानंद कदम यांचे 'वर्तमान शिक्षणातील लामणदिवे' या विषयावर, त्यानंतर डॉ. बी. एम. हिर्डेकर यांचे 'शिक्षक आणि विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता विकसन' या विषयावर व्याख्यान होईल. तिसऱ्या सत्रात ५ शिक्षकांचे निबंध सादरीकरण व अखेरच्या सत्रात प्राचार्य डॉ. प्रवीण चौगले यांचे मनोगत होईल. त्यानंतर डॉ. सुनीलकुमार लवटे यांच्या हस्ते प्रातिनिधिक प्रमाणपत्रे वितरित केली जातील. डॉ. लवटे यांच्या मार्गदर्शनानंतर परिषदेची सांगता होईल. एप्रिल २०२५ मध्ये डॉ. लवटे यांचा अमृत महोत्सव समितीतर्फे भव्य प्रमाणात साजरा केला जाणार आहे. परिषदेला प्रा. टी. के. सरगर, प्रा. सी. एम. गायकवाड, अमेय जोशी यांच्यासह समितीतील सदस्य उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 DEC 2024
पुण्यनगरी

# विद्यापीठाचा फुटबॉल संघ वडोदराला




**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाचा पुरुष फुटबॉल संघ वडोदरा (गुजरात) येथे होणाऱ्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी रवाना झाला. विद्यापीठाच्या संघाने महाराष्ट्र राज्य क्रीडा महोत्सवामध्ये प्रथम, तसेच पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत उपविजेतेपद पटकावून ऑल इंडिया खेलो इंडिया स्पर्धेत यश मिळवले होते. या संघामध्ये राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंचा समावेश आहे.

संघाला कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी शुभेच्छा आणि प्रोत्साहन दिले. विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे यांनी यावेळी खेळाडूंना मार्गदर्शन केले. यावेळी क्रीडा विभाग संचालक डॉ. शरद बनसोडे, अमर सासने, डॉ. अभिजित वणिरे उपस्थित होते. संघाच्या कर्णधारपदी प्रभू पोवार, तर उपकर्णधारपदी आरबाज पेंढारी यांची निवड करण्यात आली. या संघामध्ये जयकुमार मेथे गोलकिपर, विशाल पाटील, दर्शन पाटील, खुर्शीद अली, सिद्धेश साळोखे, देवराज मंडलिक (सर्व न्यू कॉलेज), अनिल जानकर (गोलकिपर), आरबाज पेंढारी, ओंकार लायकर, आदित्य लायकर, संकेत जरग, हर्ष जरग, साहिल डाकवे (सर्व स. ब. खाडे कॉलेज, कोपार्डे), प्रभू पोवार, शोएब बागवान, रोहित पोवार, गुरुराज काटकर, यश देवणे (सर्व शहाजी कॉलेज), गणेश जगताप, ओंकार शिर्के (रहिमतपूर), शुभम देसाई (नरके कॉलेज), कुपिंदर पोवार (शिवराज कॉलेज, गडहिंग्लज), प्रशिक्षक म्हणून अमर सासने आणि सहायह प्रशिक्षक म्हणून डॉ. अभिजित वणिरे यांचा समावेश आहे.